आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२४ सप्टेंबर २०२४ -मंगळवार

**ठळक बातम्या**

- अमेरिकेचा तीन दिवसांचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परत येण्यासाठी रवाना

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून ५ दिवसांच्या उझ्बेकिस्तान दौऱ्यावर

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात उद्या मतदान

- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज आणि उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

**आणि**

- भारतीय शेअर बाजारांमधे सलग चौथ्या सत्रात निर्देशांकांचा नवा उच्चांक / सेन्सेक्सने प्रथमच ओलांडली ८५ हजाराची पातळी

**<><><><><>**

अमेरिकेचा तीन दिवसांचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परत येण्यासाठी निघाले आहेत. डेलावेआर इथं क्वाड परिषदेत ते सहभागी झाले तसंच न्यूयॉर्कमधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भविष्यातलं जग या विषयावरच्या परिषदेत त्यांचं भाषण झालं. अमेरिकेतल्या भारतीय समुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमातही ते सहभागी झाले होते.

क्वाड परिषदेत प्रधानमंत्र्यांनी क्वाड गटाची उपयुक्तता अधोरेखित केली. मुक्त, खुल्या, सर्वसमावेशक आणि समृद्ध इंडो पॅसिफिक प्रदेशासाठी क्वाड वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. हिंदी महासागर क्षेत्रात भारताच्या नेतृत्वाचं क्वाड सदस्य देशांनी यावेळी कौतुक केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांची डेलावेर इथं भेट घेतली. यावेळी दोन्ही देशात दोन करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी जपानचे प्रधानमंत्री फुमियो किशिदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्र्यांनी न्यूयॉर्कमध्ये भारतीय अमेरिकन समूदायाला संबोधित केलं. या समूदायाची प्रतिभा आणि कौशल्य अतुलनीय असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. त्यानंतर त्यांनी तंत्रज्ञान उद्योगातल्या उच्चपदस्थांशी संवाद साधला. याच दिवशी प्रधानमंत्री मोदी यांनी नेपाळचे प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली, कुवेतचे राजपुत्र शेख सबाह खालेद अल हमाद अल सबाह आणि पॅलेस्टिनचे राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास यांच्याशी चर्चा केली. तसंच युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस तो लिम यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्लीत एशियन ऑर्गनायझेशन ऑफ सुप्रीम ऑडिट इन्स्टिट्यूशन्स च्या १६व्या परिषदेचं उद्घाटन केलं. भारताच्या सीएजी यांची देशाच्या सार्वजनिक वित्तव्यवस्थेमध्ये पारदर्शकता

आणि उत्तरदायित्त्व सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं. भारतीय संविधानानं कॅग कार्यालयाला व्यापक अधिकार आणि संपूर्ण स्वायत्तता प्रदान केली असल्याचं त्यांंनी सांगितलं. सार्वजनिक वित्तसंस्थांचे प्रभावी लेखापरीक्षण करण्यासाठी कालमर्यादाही अत्यंत महत्त्वाची असल्याचं त्या म्हणाल्या. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी लेखापरीक्षण संस्थांच्या भूमिकेवर चर्चा होणार आहे. या संमेलनात ४२ देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे २०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून ५ दिवसांच्या उझ्बेकिस्तान च्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दौऱ्यामध्ये उद्या त्या एशियन इंफ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेच्या ९ व्या वार्षिक सभेला उपस्थित राहणार आहेत. भारत आणि उझ्बेकिस्तान दरम्यान होणाऱ्या द्विपक्षीय गुंतवणूक करारावर त्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या होतील.

<><><><>

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत शेतकरी आणि शेतकरी संघटनांच्या नेत्यांशी चर्चा केली. आपण जवळपास ५० शेतकरी नेत्यांशी चर्चा करून त्यांचे मुद्दे जाणून घेतल्याचं चौहान यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी तिचा आत्मा आहेत, असंही ते म्हणाले. शेतकरी नेत्यांनी पिकांचे दर आणि पिक विमा याबद्दल अनेक सूचना केल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

<><><><><>

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी आपल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या कालच्या पहिल्या दिवशी अनेक बैठका घेतल्या आणि भागधारकांशी संवाद साधला. बिझनेस कौन्सिल ऑफ ऑस्ट्रेलियाने आयोजित केलेल्या गोलमेज परिषदेला गोयल उपस्थित होते. या बैठकीत भारताची मजबूत धोरणं आणि सुधारणांवर चर्चा झाली. भारतीय बाजारपेठेतली नवीकरणीय उर्जा, उत्पादन, शिक्षण, फिनटेक आणि ॲग्रीटेक यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीच्या संधी असल्याचं प्रतिपादन गोयल यांनी यावेळी केलं.

त्यानंतर त्यांनी सिडनी क्रिकेट मैदानावर भारतीय समुदायाच्या प्रतिनिधींशीही संवाद साधला आणि ऑस्ट्रेलिया-भारत संबंधांमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचं कौतुकही केलं.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार काल संध्याकाळी संपला. दुसऱ्या टप्प्यात २६ विधानसभा मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. यामध्ये जम्मू प्रदेशातल्या रियासी, राजौरी आणि पुंछ तर काश्मीर खोऱ्यातल्या श्रीनगर आणि बडगाम या जिल्ह्यांचा समावेश आहे. या दुसर्या  टप्प्यात २५ लाख ७८ हजार मतदार २३९ उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद करणार आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये तीन टप्प्यात विधानसभा निवडणुका होत असून ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यापैकी १८ सप्टेंबरला निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६१ टक्क्यांहून

अधिक मतदान झालं होतं. तर उर्वरित ४० विधानसभा मतदारसंघांसाठी तिसऱ्या टप्प्याचं मतदान येत्या १ ऑक्टोबरला होणार आहे.

<><><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज आणि उद्या छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येत आहेत. आगामी विधानसभा निडवणुकीच्या अनुषंगाने ते पक्ष कार्यकर्त्यांशी तसंच अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं आज छत्रपती संभाजीनगर इथं येत आहेत.

<><><><><>

जपानला आज सकाळी सव्वा आठ वाजता ५ पूर्णांक ९ रिक्टर क्षमतेच्या भूकंपाचा धक्का बसला त्यानंतर टोकियोच्या दक्षिणेकडच्या बेटांवर ५० सेंटीमीटर ऊंचीच्या त्सुनामीच्या लाटा आदळल्या. या भूकंपाचा केंद्रबिंदू पॅसिफिक महासागरात सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेल्या इझू बेट साखळीतल्या तोरिशिमाजवळ होता. भूकंपाच्या केंद्रापासून अंदाजे १८० किलोमीटर अंतरावर असलेल्या हाचिजो बेटावर ५० सेंटीमीटर आणि मियाके बेटावर १० सेंटीमीटर त्सुनामी लाटांची नोंद झाली.

<><><><><>

अमेरिकी फेडरल रिझर्व्हने गेल्या आठवड्यात केलेल्या कर्जावरच्या व्याज दरकपातीचा परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसून आला. भारतीय शेअर बाजाराच्या सेन्सेक्स आणि निफ्टी या निर्देशांकांनी आज सलग चौथ्या सत्रात नवा विक्रमी उच्चांक गाठला. आज सकाळच्या सत्रात मुंबई शेअर

बाजाराच्या सेन्सेक्सने प्रथमच ८५ हजाराची पातळी ओलांडली तर निफ्टीनेही २५ हजार ९७९ अंकांची विक्रमी वाढ नोंदवली.

<><><><><>

ईराणी चषक क्रिकेट स्पर्धांसाठी मुंबई संघाचा कर्णधार म्हणून फलंदाज अजिंक्य रहाणे याची निवड झाली आहे. त्याच्यासह शार्दुल ठाकूर, श्रेयस अय्यर, मुशीर खान, शम्स मुलानी आणि तनुश कोटियन हे मुंबईच्या रणजी संघातले खेळाडूही या संघात असतील. येत्या १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान ही स्पर्धा खेळवली जाणार आहे.

<><><><><>

विधानमंडळांची कार्यक्षमता आणि कामकाज सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर भर द्यायला हवा, असं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी व्यक्त केलं आहे. राष्ट्रकुल देशांमधल्या लोकप्रतिनिधी गृहांच्या संघटनांचं १० वं संमेलन नवी दिल्लीत भरलं आहे. त्यात ते बोलत होते. विधानमंडळांनी विविध व्यासपीठांवर चर्चा करून तळागाळातल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कल्याणकारी योजनांना आकार द्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. तंत्रज्ञान आणि दळणवळणाची साधनं दैनंदिन जीवनाचा एक भाग बनलेली आहेत अशावेळी लोकप्रतिनिधींनी जनतेच्या वाढत्या आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मार्ग शोधले पाहिजेत. तसंच शाश्वत विकास आणि सर्वसमावेशक प्रशासनाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विधिमंडळ संस्थांनी जबाबदार आणि कार्यक्षम भूमिका घ्यायला हवी, असं बिर्ला यावेळी म्हणाले.

<><><><><>

भारतीय वंशाच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. रशियन अंतराळवीर ओलेग कोनोनेन्को यांनी ही घोषणा केली. सुनीता विल्मम्स बारा वर्षानंतर पुन्हा एकदा ही जबाबदारी सांभाळणार आहेत. सुनीता विल्यम्स आणि कोनोनेन्को यांनी अंतराळात आठ दिवसांच्या मुक्कामासाठी यावर्षी ५ जून रोजी प्रवास सुरू केला होता. मात्र, अंतराळ ज्या यानातून ते दोघं गेले होते त्यात बिघाड झाल्यानं त्यांचं पृथ्वीवर परतणं रद्द झालं. हे दोघं आता २५ फेब्रुवारी २०२५ ला पृथ्वीवर परतण्याची अपेक्षा आहे.

<><><><><>

श्रीलंकेत आज नवीन मंत्रीमंडळाचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. हरिणी अमरसुर्या हे नवे प्रधानमंत्री होण्याची शक्यता असून नवीन मंत्रीमंडळात विजिता हेरथ आणि लक्ष्मण निपुण अराच्ची यांना मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. दिसानायके यांनी आपली जागा सोडल्यानंतर त्यांच्या जागी खासदार म्हणून अराच्ची यांची निवड करण्यात आली आहे.

//<><><><><>//